महाराष्ट्र शासन
आयुक्त
वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष,
५वा मजला, शासकीय दंत महाविद्यालय रुग्णालय इमारत, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, फोर्ट, मुंबई -४०० ००१
दुरध्वनी - (०२२) - २२६२०३६३-६५ संकेतस्थळ - med-edu.in

आज़ादी का अमृत महोत्सव

क्र.संवैशिवस/नीट-पीजी-२०२५/संस्थास्तरीय फेरी/शै.व. २०२५-२६/ दिनांक : १८.०३.२०२६

# कार्यालयीन आदेश

विषय : वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या संस्थास्तरीय प्रवेशासाठी निरीक्षक नियुक्तीबाबत...

संदर्भ : १. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाचे दिनांक १७.०३.२०२६ रोजीचे पत्र.
२. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाचे नोटीस नंबर १८ दिनांक १७.०३.२०२६.

मा. उच्च न्यायालय, मुंबई याचि का (स्टँप) क्रमांक ५०९०/२०२६ व ७६६८/२०२६ या याचिकांमध्ये पारीत आदेशास अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता वेदांता इन्स्टिट्युट ऑफ मेडीकल सायन्स, पालघर आणि प्रकाश इन्स्टिट्युट ऑफ मेडीकल सायन्स, सांगली येथे नीट-पीजी-२०२५-२६ (एम.डी/एम.एस) अभ्यासक्रमाच्या Online Stray Vacancy Round नंतर रिक्त जांगावरील प्रवेशासाठी संस्थास्तरीय प्रवेश फेरी संदर्भ क्रमांक २ च्या नोटीसनुसार दिनांक १७/०३/२०२६ ते २३/०३/२०२६ या कालावधी दरम्यान राबविण्यात येणार आहे.

त्या अनुषांगने वेदांता इन्स्टिट्युट ऑफ मेडीकल सायन्स, पालघर आणि प्रकाश इन्स्टिट्युट ऑफ मेडीकल सायन्स, सांगली महाविद्यालयातील (एम.डी/एम.एस) अभ्यासक्रमाच्या संस्थास्तरावरील प्रवेश प्रक्रिया सुरळीत व पारदर्शकपणे राबविणेसाठी संदर्भ क्र. १ च्या पत्रान्वये संस्थास्तरीय प्रवेश फेरीसाठी खालील अधिकाऱ्यांची "निरीक्षक" म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ.क्र | महाविद्यालयाचे नाव | निरीक्षकाचे नाव व कार्यरत संस्था | दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | वेदांता इन्स्टिट्युट ऑफ मेडीकल सायन्स, पालघर | डॉ. सुनिल पुडंगे, सहाय्यक प्राध्यापक, शरीररचनाशास्त्र, ग्रँन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई | ८६५२४१००११ |
| | | डॉ. राहूल वाघ, न्यायवैद्यकशास्त्र, ग्रँन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई | ९१७५४०६५१९ |
| २. | प्रकाश इन्स्टिट्युट ऑफ मेडीकल सायन्स, सांगली | डॉ. उल्हास मिसाळ, बधिरीकरणशास्त्र, प्राध्यापक, शासकीय राजर्षी छत्रपती शाहू महाराज वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर | ९०२८८२९४६१ |

निरिक्षकांना महत्वाच्या सूचना :-

१) निरिक्षकांनी नियुक्त केलेल्या महाविद्यालयामध्ये दिनांक १८/०३/२०२६ ते २३/०३/२०२६ या कालावधीत संस्थास्तरावरील संपूर्ण प्रवेश प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत महाविद्यालयात उपस्थित रहावे. तसेच संबंधित महाविद्यालयांकडून उपस्थिती प्रमाणपत्र घेण्यात यावें.

२) उमेदवारांचे प्रवेश नीट-पीजी-२०२५ माहिती पुस्तिकेतील नियमानुसार व उमेदवारांचे पात्रतेनुसार होईल, याची दक्षता घ्यावी.

३) नीट-पीजी-२०२५ माहिती पुस्तिकेतील नियमांचे उल्लंघन होणार याची नियुक्त निरीक्षकांनी दक्षता घ्यावी.

४) प्रवेश प्रक्रियेकरीता संबंधित महाविद्यालयामध्ये संस्थास्तरीय प्रवेश प्रक्रियेसाठी उपलब्ध असलेल्या रिक्त जागांची यादी तपासावी.

५) संस्थास्तरीय प्रवेशासाठी विहित कालावधीत मध्ये उमेदवारांकडून प्राप्त अर्जाची यादी, त्यानुसार तयार करण्यात आलेली गुणवत्ता यादी, निवड यादी, प्रतिक्षा यादी, इ. तपासून घ्यावी व खात्री करावी.

६) निवड यादीमधील उपलब्ध उमेदवार संपल्यानंतर प्रतिक्षा यादीतील उमेदवारांची निवड गुणवत्तेनुसार केली जात आहे का? याबाबतची तपासणी करण्यात यावी.

७) प्रवेश प्रक्रियेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार अथवा तक्रारी होणार नाहीत, याची संबंधित नियुक्त निरिक्षकांनी दक्षता घ्यावी.

८) सर्व निरिक्षकांनी प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रवेश प्रक्रियेचा सविस्तर अहवाल आवश्यक त्या कागदपत्रांसह आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांचेकडे ई-मेलद्वारे (www.mahacet.org) व पोस्टाने सादर करावा.

९) निरीक्षकांनी प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अर्ज ७ दिवसांचे आत आवश्यक कागदपत्रांसह राज्य सीईटी कक्षास सादर करावा. अर्जा सोबत महाविद्यालयांचे उपस्थिती प्रमाणपत्र, प्रवासाची तिकीटे, वाहन नोंदणी प्रमाणपत्र इ. सादर करावे.

वेदांता इन्स्टिट्युट ऑफ मेडीकल सायन्स, पालघर आणि प्रकाश इन्स्टिट्युट ऑफ मेडीकल सायन्स, सांगली येथील अधिष्ठाता/प्राचार्य यांना कळविण्यात येते की, उपरोक्त निरीक्षक म्हणून नेमण्यात आलेल्या अधिकाऱ्यांना प्रवेश प्रक्रियेदरम्यान आवश्यक ते सर्व सहकार्य करावे.

संस्थास्तरीय प्रवेश फेरीकरीता नियुक्त निरिक्षकांना शासन नियमानुसार प्रवास भत्ता, दैनिक भत्ता व प्राधिकरणाचे मंजूर दरानुसार मानधन राज्य सामाईक प्रवेश कक्षाकडून अनुज्ञेय राहील.

८.०७.२०

(अनिल भंडारी) भा.प्र.से.
आयुक्त,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई

प्रति,

१. डॉ. उल्हास मिसाळ, बधिरीकरणशास्त्र, प्राध्यापक, शासकीय राजर्षी छत्रपती शाहू महाराज वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर
२. डॉ. सुनिल पुडंगे, सहाय्यक प्राध्यापक, शरीररचनाशास्त्र, ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई
३. डॉ. राहूल वाघ, न्यायवैद्यकशास्त्र, ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई

प्रत,

१. मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
२. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई